महाराष्ट्रामध्ये प्रत्येक ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे अधिक माहितीसाठी 8983242343

निर्भीड निष्पक्ष मराठी वृत्तपत्र

मुख्य संपादक: रघुनाथ गणपत कडू

RNI NO. MAHMUL/2023/88828

# रायगड स्वाभिमान

संपादक: दिनेश चांगू मोरे | सह संपादक : अरविंद अनंता मगर | आवृत्ती संपादक : किरण लक्ष्मण मोरे

शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२५. बातम्या जाहिरात व प्रतिनिधी नियुक्ती साठी संपर्क : ८९८३२४२३४३




# भारतीय स्टेट बँक शाखा समुद्रपुर चे वतीने वित्तीय समावेशक शिबिर संपन्न



**सुरेश जी भगत समुद्रपुर**

भारतीय स्टेट बँकेच्या वतीने वित्तीय समावेशन शिबिर लसनपुर तालुका समुद्रपूर जिल्हा वर्धा आयोजित करण्यात आले. स्थळ दिपाली कॉम्प्लेक्स समुद्रपूर विद्या विकास कॉलेज समोर दिनांक 25 / 82025 सोमवार वेळ सकाळी 10.30 पासून पुढे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतीय रिझर्व बँकेचे निदेशक श्री सचिन शेंडे सर, उपमहाप्रबंधक श्रीमती अंजना शामनाथ मॅडम, भारतीय स्टेट बँक उपप्रबंधक निदेशक श्री अरविंद कुमार सिंह, अग्रणी जिल्हा प्रबंधक श्री चेतन शिरभाते, समुद्रपूर शाखा व्यवस्थापक धनवीजय साहेब इत्यादी मान्यवर मंडळी होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली यामध्ये या सर्व सेवा उपलब्ध केल्या गेल्या पी एम जे डी वाय आणि निष्क्रिय असलेले खाते सक्रिय करणे रुपे कार्ड वितरण व सक्रिय करणे पी एम जे बी वाय विमा नोंदणी अटल पेन्शन योजना किसान क्रेडिट कार्ड(KCC) (SHG)व स्वयंसाहाय्यता गट जोडणी डिजिटल बँकिंग मार्गदर्शन (UPI, AEPS,) मोबाईल बँकिंग या संपूर्ण योजनेची माहिती यावेळी देण्यात आली या शिबिराला बऱ्याच लोकांनी चांगला प्रतिसाद दिला शिबिर चांगल्या प्रकारे पार पडले या शिबिरामध्ये महिला बचत गटातील महिला शेतकरी युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते व सर्वांना कार्यक्रमानंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली सर्वांनी समुद्रपूर भारतीय स्टेट बँकेचे आभार मानले हा शिबिराचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला आयोजक स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा समुद्रपूर